# डाळिंब शेतीतून घेतले विक्रमी उत्पादन



कृषी रत्न

**आप्पासाहेब शिंदे**
निमगाव (टें.) माढा, सोलापूर

माढा तालुक्यातील निमगाव (टें.) येथील शेतकरी आप्पासाहेब शिंदे यांनी डाळिंब शेतीत चालू वर्षी विक्रमी उत्पन्न घेतले आहे. त्यांना त्यांच्या चार एकर शेतामध्ये डाळिंब बागेत ३५ टन उत्कृष्ट प्रतीचे (निर्यात प्रतीचे) डाळिंबाचे उत्पन्न मिळाले आहे. चालू बाजार भावाप्रमाणे सुमारे ३४ लाख इतकी रक्कम त्यांना त्या शेतातून उत्पन्न म्हणून मिळणार आहे. त्यांच्या परिवाराकडे एकूण १३ एकर शेती असून त्यामध्ये डाळिंबाबरोबरच पेरू, सीताफळ ऊस आदी पिके ते घेत आहेत. डाळिंब शेतीतील वैशिष्ट्यपूर्ण आणि विक्रमी उत्पन्न घेण्यामधील गमक सांगताना त्यांनी खालील बाबींवर तपशीलवार प्रकाश टाकला.

डाळिंबाची रोपे ही अडीच वर्षांपूर्वी जैन टिशू कल्चर लॅबोरेटरी जळगाव यांच्याकडून खरेदी केली.

जमिनीची मशागत करताना जास्तीत जास्त सेंद्रिय खतांचा वापर केला.

डाळिंबाचा ताण योग्य वेळेमध्ये आणि योग्य हवामाना मध्येच दिला. पाणी व्यवस्थापनामध्ये पानांची व संपूर्ण डाळिंबाच्या झाडांची अवस्था पाहून निर्णय घेतले गेले. आंतर मशागतीसाठी यंत्राचा वापर केल्यामुळे मजुरी खर्चात मोठी बचत झाली. वेळेत आंतरमशागत पूर्ण करण्यात यश आले. फवारणी करताना डाळिंबाचे पीक हे उत्पादन देताना रेसिड्यू फ्री मिळेल, याचा काटेकोर वापर केला. रसायनांचा ब्रँड आणि कंपनी हे तपासून पाहिले.

७ा ळे ट ा

फळांची काढणी वाहतूक आणि मार्केटिंग केले. या सर्व गोष्टीमुळे अत्यंत कमी पाण्यात जास्तीत जास्त गुणवत्तेचा माळ निर्माण झाला. आप्पासाहेब यांचे कुटुंब फार कष्टाळू असून त्यांचे वडील महादेव व आई सोजर यांच्या कष्टाचा वारसा त्यांना लाभलेला आहे. आप्पासाहेब हे त्यांच्या शेतीतील संपूर्ण यशाचे श्रेय त्यांच्या कांचन नावाच्या पत्नीस देतात. त्यांची अशी धारणा आहे की, त्यांच्या पत्नी आणि मुलांची मिळालेली साथ ही त्यांना आयुष्यातील ईश्वराने दिलेली बहुमोल देणगी आहे. मुलगा ओंकार व मुलगी अंकिता ही दोन्ही मुले आपापल्या परीने आपापल्या ताकदीप्रमाणे आई-वडिलांना शक्य ती सर्व मदत करतात. त्यामुळे त्यांचा परिवार आदर्श परिवार झाला आहे. त्यांच्या परिवारात नेहमी शेतीतील अभिनव प्रयोग चाललेले असतात. खते सोडताना अत्यल्प उपलब्ध पाणी पिकांना देताना त्यांनी दाखविलेले कौशल्य वाखाणण्याजोगे आहे. या सर्व डाळिंब शेतीत राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राच्या संचालिका डॉक्टर ज्योत्स्ना शर्मा व त्यांचे सर्व टिमचे मार्गदर्शन असल्याबाबत त्यांनी आवर्जून सांगितले.

डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूरचे 'सोलापूर अनार' नावाचे ॲप शेतकऱ्यांना उपयोगी असल्याबाबत त्यांनी सांगितले. शेतीतील सर्व उपक्रमात कृषी विभागाचे मंडळ अधिकारी संजय पाटील, राजाभाऊ नेटके व सहाय्यक कृषी अधिकारी जयवंत नलावडे यांचे सहकार्य असल्याबाबत त्यांनी याठिकाणी आवर्जून सांगितले. या सर्व शेती प्रगतीच्या वाटचालीमध्ये इंदापूर तालुक्यातील शेतीतज्ज्ञ महादेव काळंगे आणि नामदेव किरकत यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य मिळालेले आहे. तसेच टेंभुर्णी येथील गणेश कृषी केंद्राचे संतोष चट्टे यांचे सहकार्य आहे.

भविष्यकाळामध्ये डाळिंब बरोबर आणि सीताफळ या पिकांमध्ये विक्रमी उत्पन्न घेण्याचे नियोजन करीत असल्याचे मनोगत यावेळी व्यक्त केले.

**- राजेंद्र केदार, कन्हेरगाव**